आर.सी.सी.क्रं.७४/२०२२

नि. क्रमांक २३.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

माझे नाव :– वर्षा शिवाजी म्हाळस्कर,

वय सुमारे :– ३५ वर्षे, व्यवसाय :– गृहिणी,

रा. :– म्हाळस्करवस्ती, वडगाव मावळ, ता. मावळ, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत</u>**

०१. मी म्हाळस्कर वस्ती वडगाव मावळ येथे माझे पती व दोन मुले असे मिळुन राहतो. मी आरोपींना ओळखते कारण ते माझे दीर आहेत. दि. २४/०५/२०२१ रोजी माझ्या घराच्या समोर दुपारी २.०० वा च्या सुमारास माझे दीर उमेश, महेश व भाचा गौरव शेठ असे मिळून माझ्या सासुंच्या १३ रुमचे सांडपाणी जाण्यासाठी खड्डा खोदत होते. आम्ही खड्डा खोदण्यास विरोध केला असता ते आम्हाला म्हणाले की, आम्ही घाबरत नाही. तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांनी माझ्या पतीस गचु–यास धरुन खाली पाडले व त्यांना मारहाण करु लागले. त्यानंतर उमेश म्हाळस्कर याने घरामध्ये जावून लाकडी बॅट आणली व सदर बॅटने माझ्या पतीस डाव्या हातावर व कंबरेवर मारहाण करुन गंभीर दुखापत केली.

०२. भांडणाचा आवाज ऐकूण तेथे आजुबाजूचे लोक जमा झाले. मी महेश म्हाळस्कर यांना दोन गुंठे जमीन खरेदी घेण्यासाठी दीड लाख रुपये दिले होते. परंतू ते पैसे परत देत नव्हते त्यामुळे त्यांचा आमच्यावर राग होता. सदरचे पैसे देत नसल्यामुळे त्यांनी आम्हाला मारहाण केली. भांडणानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी आम्हाला औषधोपचारासाठी तळेगाव येथील शासकीय दवाखान्यात पाठवले. आमच्यासोबत विलास साबळे व विजय पाटील हे दवाखान्यात हजर होते. भांडण चालू असतांना विलास साबळे व विजय पाटील हे तेथे हजर असल्यामुळे ते आमच्यासोबत दवाखान्यात आले होते. तळेगाव येथील दवाखान्यामध्ये विजय पाटील यांच्या मोटरसायकलवरुन गेलो होतो. तळेगाव येथील डॉक्टरनी सांगितले की, हात मोडलेला आहे ऑपरेशन करावे लागेल. त्यानंतर पुढील औषधोपचारासाठी माझ्या पतीस निगडी येथील दवाखान्यामध्ये पाठवण्यात आले. निगडी येथील दवाखान्यामध्ये माझ्या पतीचे हाताचे ऑपरेशन झाले. ऑपरेशन झाल्यानंतर दोन ते अडीच महिन्यानंतर घटनेबाबत खबर देण्यासाठी आम्ही वडगाव मावळ येथील पोलीस

ठाण्यामध्ये गेलो. आरोपींनी ज्या लाकडी बॅटने माझ्या पतीस मारहाण केली होती ती पाहिल्यास मी ओळखू शकते. आता मला सिलबंद मुद्देमाल क्र. ३३/२०२१ लाकडी बॅट दाखवण्यात आली. सदरची बॅट हि तीच बॅट आहे. सदर बॅटला **वस्तूचिन्ह अ** देण्यात येते. तपासादरम्यान पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकते. तीन्ही आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्रीमती मांडेकर यांच्या तर्फे शपथेवर सुरु.**

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या कुटूंबातील मोठी सूण आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न पंधरा ते वीस वर्षांपूर्वी झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न झाले त्यावेळी आम्ही एकत्र कुटूंबात राहत होतो. लग्नानंतर दोन महिन्यानंतर मी व माझे पती एकत्र कुटूंबातून विभक्त झालो होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासू आशा बबन म्हाळस्कर हिस सन २०१५ ते २०१६ मध्ये पायाचा अर्धांग वायू झालेला आहे त्यामुळे त्या अंथरुणावरच असतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे सन २०१४ मध्ये मरण पावले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासू, आरोपी क्र. १ व २ यांच्या नावे असलेलया बारा ते तेरा खोल्या भाडयाने दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, खोल्या भाडयाने दिलेल्या भाडयामधून माझ्या सासूचा औषधोचाराचा खर्च भागतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी विधवा ननंद भारती सपकाळ हिस आर्थिक मदत भाडयातून येणा–या पैशाव्दारे आरोपी क्र. १ व २ करतात. हे म्हणणे खरे आहे की, माझी छोटी ननंद मयत असून तीचा पतीदेखील मयत आहे व त्यांचा मुलगा आरोपी क्र. ३ गौरव शेठ याचे पालन पोषण आरोपी क्र. १ व २ आजरोजी करतात.

०४. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे यांनी त्यांच्या हयातीमध्ये पीक अप नोंदणी क्र. एम एच १४ ए एच १५८६ माझे पती यांना कुटूंबाच्या पालन पोषणासाठी विकत घेवून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही राहत असलेल्या जागेची खातेफोड झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या घरामध्ये असलेल्या रस्त्यावरुन बैलगाडी व ट्रॅक्टर जाउ शकते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचे घर लगत असून घरापासून पाच मिनिटाच्या अंतरावर आहे. आरोपीच्या घराचे तोंड हे उत्तरेस आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरासमोर अंगण आहे व अंगणामध्ये फरश्या टाकलेल्या आहेत व बसण्यासाठी कठडा बांधलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे बाथरुम हे पंधरा ते वीस वर्षे जुणे

आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे बाथरुम हे आरोपी क्र. १,२ व ३ वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या बाथरुमचे सांडपाणी हे घराच्या पाठीमागेच मुरते.

०५. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२३ मध्ये मी व माझ्या पतीने आरोपींच्या पिण्याच्या पाण्याचे नळ हे मातीखाली पुरुन टाकले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचे घर हे जवळ जवळ हाकेच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १७/०३/२०१७ रोजी माझे पती दारु पिवून घरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने दारु पिवून माझ्या सासूस शिवीगाळी केली होती.

०६. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी माझे पती दारु पिवून आले होते व घरासमोर त्यांचा पाय घसरुन सिमेंटच्या कठडयावर पडून त्यांच्या हातास जखम झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही राहत असलेल्या ठिकाणी आमचा स्वानंद वॉटर सप्लाय या नावाने पाण्याचा धंदा आहे. माझी मुले पोदार शाळेमध्ये शिकतात. हे म्हणणे खरे आहे की, घटना हि मे २०२१ मध्ये घडली होती व अहवाल हा ऑगस्ट २०२१ मध्ये नोंदवला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझा व माझ्या पतीचा भांडखोर स्वभाव असल्यामुळे आम्ही लग्नाच्या दोन महिन्यानंतर एकत्र कुटूंबातून विभक्त झालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासूच्या नावे येणा–या भाडयाच्या पेशावरुन आमच्यामध्ये व आरोपींमध्ये सतत भांडण होत होते. आरोपी हे माझ्या सासूस त्रास देत असल्यामुळे त्यांच्यामध्ये व आमच्यामध्ये वाद होत होते. मी व माझ्या पतीने सासूस सांभाळण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सासूचा कधीही सांभाळ केला नाही व तिच्याकडे दुर्लक्ष केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयामध्ये खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE Date: 2026.01.06 13:41:42 +0530

**दिनांक. ०६/०१/२०२६.**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडगाव,**

**ता.मावळ, जि. पुणे.**